जाहीर नोटीस

तमाम लोकांना (दुकानदार) याद्वारे कळविणेत येते की, जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग व मुख्यन्यायदंडाधिकारी न्यायालय, सिंधुदुर्ग येथील नादुरुस्त व निर्लेखित केलेल्या दोन झेरॉक्स मशीनची निविदा पध्दतीने विल्हेवाट लावावयाची आहे. सदर नादुरुस्त व निर्लेखित केलेले पुढील वर्णनाचे झेरॉक्स मशीन त्यांचे घसारा वजा जाता आलेल्या रक्कमेस (आधारभूत किंमत) किंवा त्याहुन अधिक रक्कमेस विकत घेणेस तयार असलेल्या लोकांकडुन (दुकानदार)सदर जाहिर नोटीसमध्ये उल्लेख केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अ. क्र.	झेरॉक्स मशीनचा तपशिल	प्रतिनगाची आधारभुत किंमत	एकूण नग	एकूण आधारभूत किंमत
१	Konica Minolta Digital Copier Model Bizhub 287	४९९४.५०/–	१	४९९४.५०/– पुर्णांकात ४९९५/–
२	Konica Minolta Digital Copier Model Bizhub 206	१९३२.३९/–	१	१९३२.३९/– पुर्णांकात १९३२/–

अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशिलासह तारखेसहीत, बंद लखोटयामधून, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग, मु.ओरोस यांचे नावे असावे. लखोटयावर **'निर्लेखित झेरॉक्स मशीन खरेदीसाठी दरपत्रक'** असा उल्लेख करणेत यावा.

२) दरपत्रक सादर करणा–या विक्रेत्यांचा 'वस्तु व सेवा कर' नोंदणी क्रमांक असणे आवश्यक आहे.

३) सर्वात जास्त दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

४) जाहीर नोटीसीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

५) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग ओरोस यांचा राहील.

तरी इच्छुक पुरवठादार यांनी आपली दरपत्रके **दिनांक २७/०६/२०२५** पर्यंत या कार्यालयात सादर करावीत.

17/06/2025

दिनांक :–१७/०६/२०२५

सहाय्यक अधीक्षक (वित्त),
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

म.जा.क्र.ग्रंथा/३०२५ सन २०२५
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक :– १७/०६/२०२५

प्रत माहितीसाठी व जरुरत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

१. मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई–मेलद्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेलद्वारे)
७. मा.जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे नोटीसबोर्डवर तसेच संकेतस्थळावर
८. डी.एस्.ए., जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता